पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक १३**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. ३०/६/२०२०** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्र. २४६**

सह महापालिका आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. ४ यांच्या अखत्यारीतील दि. १६/५/२०२० ते दि.३१/५/२०२० पर्यंतची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/प्र.क्र.४/१३६ दि.१९/६/२०२० चे पत्र.

**हिशोब तपासणी अहवाल**

**विषय क्र. २४७**

कर आकारणी व कर संकलन खात्याकडील पेठ लोहगाव सन २०१६-१७ मधील ए फॉर्म आकारणी प्रकरणांची व तदनुषंगिक कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/४२६ दि. १८/६/२०२० ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. ८ सन २०२०-२०२१ चा विचारासाठी.

**मागील सभेचे विषय**

**विषय क्र. २४८**

अग्निशमन सेवा पुरविणेच्या दरामध्ये मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे दरवाढ करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/अग्निशमन/७१ दि.२०/५/२०२० चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. २९/५/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २४९**

कोविड-१९ ची रोगराईमुळे तसेच अन्य कारणामुळे दि. ३१/०३/२०२० अखेर पर्यन्त झालेल्या कामांची/आदा न केलेल्या बिलांकरिता मा. स्थायी समिती ठराव क्रमांक ८३ दि. २८/०४/२०२० अन्वये दि.३०/०५/२०२० अखेर पर्यन्त दिलेल्या मुदतवाढी मध्ये प्राप्त झालेली सन २०१९-२०२० च्या अर्थसंकल्पातील ज्या भांडवली व विकास कामांची देयके प्राप्त झाली आहे अशी बिले अदा करण्यासाठी सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकामधून तरतूद उपलब्ध करुन देणेस व अशा कामांची देयके अदा करण्यासाठी खालीलप्रमाणे कपात करण्यास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/१३१ दि.१६/६/२०२० चे पत्र.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मुख्य खाते– | सन २०२०–२१ या आर्थिक वर्षासाठी मान्य तरतूद र.रु.३७५.६० कोटी | सन २०२०–२१ या आर्थिक वर्षाच्या संबंधीत मुख्य खात्याच्या भांडवली तरतूदीमधून करावी. |
| २) | ‘ स ‘ यादी– | सन २०२०–२१ या आर्थिक वर्षासाठी मान्य तरतूद र.रु.२९७.१३ कोटी | अ) सन २०२०–२१ च्या अंदाजपत्रकातील भांडवली ‘‘स’’ यादीच्या तरतूदीतून सरसकट सर्व मा.सभासदांच्या ‘‘स’’ यादीला २५ टक्के कपात **किंवा**<br>ब) ज्या मा. सभासदाच्या कामांची देयके आदा करावयाची आहेत . त्याच मा. सभासदांच्या सन २०२०–२१च्या अंदाजपत्रकातील भांडवली ‘‘स’’ यादी मधुन |

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २३/६/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**उपनगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**

**सुचना – कोरोना विषाणूमुळे उद्‌भवलेली परिस्थिती विचारात घेवून मे.केंद्र व राज्य शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे ही विनंती.**